जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 OCT 2025
पुढारी

# पर्यावरण संतुलनासाठी उपभोग कमी करावा

## ज्येष्ठ पत्रकार अनुप जयपूरकर; शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवाने उपभोगाचे प्रमाण कमी केल्यास पर्यावरणाचे संतुलन होण्यास मदत होईल, असे मत पुणे येथील पर्यावरण प्रश्नांचे अभ्यासक, ज्येष्ठ पत्रकार अनुप जयपूरकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स आणि लक्ष्मी मल्टिपर्पज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'पर्यावरणभान आणि पत्रकारिता' या एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'पर्यावरणभान आणि पत्रकारिता' या विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन रोपट्याला पाणी घालून झाले. यावेळी डावीकडून विनायक देसाई, डॉ. शिवाजी जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अनुप जयपूरकर, शरद आजगेकर, हरीष सायवे आदी.**

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर किर्लोस्कर. ऑईल इंजिन्सचे जनरल मॅनेजर हरिष सायवे, लक्ष्मी मल्टिपर्पज फाऊंडेशनचे विनायक देसाई, पर्यावरण अभ्यासक संदीप चोडणकर आणि अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव उपस्थित होते.

जयपूरकर म्हणाले, विकास आणि प्रगतीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात उत्खनन सुरू आहे. जंगलतोड, शहरीकरण आदींमुळे आपत्तींना तोंड द्यावे लागत आहे. अलीकडेच मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीने शेतीयोग्य माती वाहून गेली. या परिसरात नजीकच्या काळात पुरेशी शेती पिकू शकणार नाही, या प्रश्नांची तीव्रता कमी करायची असेल तर माणसांनी सवयी बदलून निसर्गपूरक सवयींचा अंगीकार केला पाहिजे.

दुसऱ्या सत्रात पाणी प्रश्नाचे अभ्यासक संदीप चोडणकर म्हणाले, मानवाच्या अस्तित्वासाठी नदी आणि पाण्याची शुद्धता आवश्यक आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी साक्षरता राबवली पाहिजे.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, देशातील जंगलेच प्रदूषणामुळे धोक्यात असून त्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. प्रास्ताविक अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सानिका पाटील हिने केला. सूत्रसंचालन समृद्धी मोदक हिने तर आभार जिजा जाधव हिने मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 OCT 2025
पुण्यनगरी

# हिंदीमध्ये रोजगाराच्या अनेक संधी : अमरदीप कुलश्रेष्ठी

## विद्यापीठात 'हिंदी पखवाडा' समारोप आणि पुरस्कार वितरण सोहळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

हिंदी जगामध्ये बोलली जाणारी दुसऱ्या क्रमांकाची भाषा आहे. या भाषेच्या माध्यमातून अनुवाद, राजभाषा अधिकारी यासह विविध क्षेत्रांमध्ये अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. यासाठी भाषेच्या विद्यार्थ्यांचे दोनपेक्षा अधिक भाषांवर प्रभुत्व असले पाहिजे, असे प्रतिपादन यूको बँकेचे पुणे येथील राजभाषा अधिकारी अमरदीप कुलश्रेष्ठी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये सोमवारी 'हिंदी पखवाडा' समापन समारोह व त्यानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ झाला. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून आजरा महाविद्यालयाचे डॉ. अशोक बाचूळकर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या.

डॉ. बाचूळकर म्हणाले, भाषा मानवी समाजाला जोडते; मात्र जपून वापर न केल्यास ती तोडूही शकते. साहित्यिकांनी नवसंजीवनीची घुटी समाजाला दिली पाहिजे. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी यूको बँकेचे हिंदी भाषेच्या प्रसारातील योगदानाबद्दल कौतुक केले. यावेळी हिंदी विभाग व यूको बँकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हिंदी पंधरवड्यानिमित्त पोस्टर प्रेझेंटेशन, काव्य वाचन, शॉर्ट फिल्म मेकिंग, वाद-विवाद, निबंध लेखन व अनुवाद स्पर्धेतील विजेत्यांचा रोख रक्कम, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी यूको बँकेचे व्यवस्थापक क्रांतिकुमार देवरे उपस्थित होते.

.जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 9 OCT 2025
तरुण भारत

# सारथी उपकेंद्र संशोधक विद्यार्थ्यांची एकदिवसीय कार्यशाळा

कोल्हापूर : छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेच्या माध्यमातून मराठा, कुणबी, कुणबी–मराठा आणि मराठा–कुणबी या लक्षित गटातील होतकरु विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विकासासाठी अविरत प्रयत्न केले जात आहेत. त्याच अनुषंगाने सारथी उपकेंद्र कोल्हापूरच्यावतीने संशोधक विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, संशोधनाचा थेट उपयोग ग्रामपंचायत, शाळा, महाविद्यालये, शेतकरी गट व सामाजिक संस्थांशी संवाद साधत समाजकार्यासाठी व्हावा.

छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेतून आतापर्यंत पाच विद्यापीठांतील ४२६ विद्यार्थ्यांना लाभ घेतला. संशोधन केवळ मर्यादित न राहता समाजाच्या जीवनमानात परिवर्तन घडवणारे ठरावे, अशी अपेक्षा सारथीच्या सह व्यवस्थापकीय संचालक श्रीमती किरण कुलकर्णी यांनी व्यक्त केली. दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. डॉ. एस. डी. डेळेकर यांनी 'संशोधनाची उपयुक्तता व स्टार्टअप' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यकारी अधिकारी, सारथी पुणेचे डॉ. विलास पाटील यांनी प्रस्ताविक केले. संशोधन अधिकारी नयन गुरव यांनी आभार मानले. यावेळी सहा लेखाधिकारी, सारथी उपकेंद्र कोल्हापूरचे अनिस पटेल आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आरडं ड्यू

0 9 OCT 2025

# संख्याशास्त्राचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात झळकणारे तेजस्वी तारे: कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाचे माजी विद्यार्थी हे आपल्या कर्तृत्वाने विविध क्षेत्रांत झळकणारे तेजस्वी तारे आहेत. त्यांचा शिक्षक म्हणून आम्हाला अतिशय अभिमान वाटतो, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज काढले. विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्यात संबोधित करताना ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागात आज माजी विद्यार्थी मेळावा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हा कार्यक्रम कालच उद्घाटन झालेल्या संख्याशास्त्र सभागृहात पार पडला. उद्घाटन अधिविभागाचे माजी विद्यार्थी तसेच विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. दिगंबर शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी विभागातील सेवानिवृत्त प्राध्यापक तथा कुलगुरू डॉ. शिर्के, डॉ. डी. एन. काशीद आणि डॉ. एच. व्ही. कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
आरडँट न्यू
0 9 OCT 2025

# साहित्याद्वारे मानवतेच्या जाणीवा सजग राखणे विद्यापीठांची जबाबदारी: कुलगुरू डॉ.दिगंबर शिर्के

कोल्हापूर : साहित्याच्या माध्यमातून समाजामध्ये मानवतेच्या जाणीवा सजग राखणे ही विद्यापीठांची जबाबदारी आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ कर्तव्यभावनेतून कार्यरत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात संत तुकाराम अध्यासन आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रंथ प्रकाशन सोहळ्यामध्ये ते बोलत होते.

कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. दिलीप कुलकर्णी (कुरुंदवाड) आणि अरुण जाधव (तळाशी) प्रमुख उपस्थित होते.